# १. महाराष्ट्र पोलीस दलाची रचना व मनुष्यबळ

## १. महाराष्ट्र पोलीस दलाची रचना

संपूर्ण राज्याच्या पोलीस दलाचे नियंत्रण व प्रशासन पोलीस महासंचालक यांच्या हाती सोपविण्यात आले आहे. त्यांच्या मदतीस अपर पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक व जिल्हा पोलीस अधीक्षक दर्जाचे सहायक पोलीस महानिरीक्षक असे अधिकारी असतात. पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने राज्यामध्ये ८ परिक्षेत्रे व ९ पोलीस आयुक्तालये निर्माण करण्यात आली आहेत. सर्व परिक्षेत्रांवर **विशेष पोलीस महानिरीक्षक** प्रभारी असून सर्व आयुक्तालयांचे प्रभारी **पोलीस आयुक्त** आहेत.

## २. जिल्हा पोलीस दलाची रचना

(१) प्रत्येक जिल्ह्याकरिता एक **पोलीस अधीक्षक** असतात, आणि जरुरीनुसार एक अथवा अधिक अपर पोलीस अधीक्षक असतात. जिल्ह्याची विभागणी दोन अथवा अधिक उप विभागांमध्ये केलेली असते आणि त्यावर सहायक अथवा उप पोलीस अधीक्षक दर्जाचे **उप विभागीय पोलीस अधिकारी** प्रभारी असतात. प्रत्येक उप विभागात मुख्यत: गुन्हे तपासावर देखरेख करण्यासाठी दोन अथवा अधिक **मंडल पोलीस निरीक्षक** असतात.

(२) प्रत्येक उप विभागात दोन अथवा अधिक पोलीस ठाणी असतात. सामान्यपणे **पोलीस उप निरीक्षक अथवा सहायक पोलीस निरीक्षक** हे पोलीस ठाण्याचे प्रभारी असतात, परंतु महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस निरीक्षक हे प्रभारी असतात व त्यांच्या सहकार्यासाठी एकाहून अधिक पोलीस उप निरीक्षक व ठराविक संख्येत पोलीस कर्मचारी असतात.

(३) दूर पल्ल्याच्या ठाण्याचे हद्दीतील गावकऱ्यांना पोलीस ठाण्यात येण्यासाठी होणारा विलंब लक्षात घेऊन पोलीस मदत लवकरात लवकर मिळणेकरिता, सोयीनुसार पोलीस दुरक्षेत्रे व पोलीस चौक्यांची स्थापना केलेली आहे. तेथे नेमण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी त्यांना सहकार्य करीत असतात.

## ३. पोलीस आयुक्तालयाची रचना

(१) बृहन्मुंबई **पोलीस आयुक्तांच्या** मदतीसाठी तीन **सह पोलीस आयुक्त** (१) गुन्हे (२) प्रशासन (३) कायदा व सुव्यवस्था यांची नेमणूक करण्यात आली आहे. आयुक्तालयाची विभागणी चार परिक्षेत्रामध्ये करण्यात आली असून प्रत्येक परिक्षेत्राचे प्रभारी **अपर पोलीस आयुक्त** आहेत. प्रत्येक परिक्षेत्र विविध परिमंडळात विभागले आहेत. प्रत्येक परिमंडळावर पोलीस अधीक्षकांच्या दर्जाचे **पोलीस उप आयुक्त** हे प्रभारी असतात.

(२) परिमंडळाची विभागणी दोन अथवा अधिक विभागात करण्यात आली असून त्यावर **सहायक पोलीस आयुक्त** हे प्रभारी असतात.

(३) प्रत्येक विभागात ३ अथवा अधिक पोलीस ठाण्यांचा समावेश होतो. पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून **वरिष्ठ पोलीस निरीक्षक** असतात. त्यांच्या मदतीस ५ पोलीस निरीक्षक नेमले जातात व ठराविक संख्येत पोलीस अधिकारी व कर्मचारी असतात.

(४) बृहन्मुंबई आयुक्तालयाव्यतिरिक्त राज्यात आणखी आठ ठिकाणी म्हणजेच ठाणे, नागपूर, पुणे, नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक, सोलापूर, अमरावती येथे आयुक्तालये स्थापन करण्यात आली आहेत. या ठिकाणी वरीलप्रमाणे परिमंडळ, विभाग व पोलीस ठाणी आवश्यकतेप्रमाणे स्थापन केली आहेत.

(५) तसेच कायदा व सुव्यवस्था राखणेकरिता प्रत्येक ठाण्याचे हद्दीत जरुरीप्रमाणे व सोयीप्रमाणे पोलीस चौक्या उभारण्यात आलेल्या आहेत.

## ४. स्थानिक गुन्हे शाखा आणि गुप्तवार्ता शाखा

(१) महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि विशेषत: ज्यामध्ये स्थानिक गुन्हेगारांच्या कारवाया एकाहून अधिक पोलीस ठाण्यांच्या हद्दीत पसरल्या आहेत, त्या ठिकाणी जिल्ह्यातील गुन्हे आणि गुन्हेगारांबाबतची माहिती गोळा करून तपासणी करण्याकरिता गुन्हे अन्वेषण विभागाच्या धर्तीवर लहान स्वरुपाची स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधीक्षक यांच्या थेट नियंत्रणात स्थापन करण्यात आली आहे व त्यामध्ये पोलीस निरीक्षक/सहायक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक आणि जरूर तो कर्मचारी वर्ग यांचा समावेश करण्यात आला आहे.

(२) त्याचप्रमाणे पोलीस अधीक्षक यांच्या नियंत्रणात गुप्तवार्ता शाखा (जिल्हा विशेष शाखा ) असते. ही शाखा पोलीस निरीक्षक यांच्या प्रभाराखाली गुप्तवार्ता जमा करण्याचे आणि जिल्ह्यातील राजकीय व तत्सम इतर हालचालींची माहिती गोळा करण्याचे काम करते.

## ५. राज्य गुन्हे अन्वेषण विभाग

राज्याचा गुन्हे अन्वेषण विभाग हा **अपर पोलीस महासंचालक** यांच्या नियंत्रणात आहे. त्यांच्या मदतीस एक विशेष पोलीस महानिरीक्षक, एक पोलीस उप महानिरीक्षक तसेच अनेक पोलीस अधीक्षक आणि इतर अधिकारी व कर्मचारी आहेत. प्रत्येक परिक्षेत्राकरिता एक घटक असून त्यावर प्रभारी म्हणून **अपर पोलीस अधीक्षक** असतात. राज्यपातळीवर गंभीर व महत्त्वाच्या प्रकरणांचा सखोल तपास करण्याचे काम या गुन्हा अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात येते.

## ६. राज्य राखीव पोलीस दल

राज्यात कोठेही अशांतता किंवा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्यासाठी आधुनिक शस्त्रांनी सज्ज असलेल्या राज्य राखीव पोलीस बलाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या या दलाचे १३ गट असून प्रत्येक गट पोलीस अधीक्षक दर्जाचे **समादेशक** यांच्या नियंत्रणात आहे त्यांच्या मदतीस विविध दर्जाचे अधिकारी असतात. सर्व गट हे **विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस दल** यांच्या प्रशासकीय नियंत्रणात येतात.

## ७. महाराष्ट्र पोलीस अकादमी

(१) पोलीस उप निरीक्षक आणि त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या प्राथमिक प्रशिक्षणाकरिता नाशिक येथे महाराष्ट्र पोलीस अकादमी स्थापन करण्यात आली असून त्याचे प्रभारी '**संचालक**' आहेत. त्यांच्या मदतीस पोलीस अधीक्षक दर्जाचे **उप संचालक,** जरूर त्या संख्येत पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस अभियोक्ते, पोलीस हवालदार हे असून ते प्रशिक्षक म्हणून काम करतात.

(२) पोलीस दलातील पोलीस शिपायांच्या प्रशिक्षणाकरिता पोलीस प्रशिक्षण शाळा स्थापन करण्यात आल्या असून त्यांचे प्रभारी **पोलीस अधीक्षक अथवा उप अधीक्षक** दर्जाचे प्राचार्य असतात. त्यांच्या मदतीस प्रशिक्षक म्हणून नियुक्त केलेले जरूर त्या संख्येत अधिकारी व कर्मचारी असतात. सध्या जालना, खंडाळा, नानवीज (दौंड), नागपूर, अकोला, मरोळ(मुंबई) अशा सहा ठिकाणी **पोलीस प्रशिक्षण विद्यालये** कार्यरत आहेत.

## ८. वाहतूक नियंत्रण विभाग

(१) सर्व आयुक्तालयात व काही जिल्ह्यांमध्ये स्वतंत्र वाहतूक शाखा स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या शाखेतून पुढील कर्तव्ये केली जातात :-

(अ) मोटार अपघातास प्रतिबंध व्हावा म्हणून वाहतुकीचे सर्वसाधारण आणि मोटार वाहतूकीचे विशेष करून नियमन करणे.

(ब) मोटार अपघाताच्या प्रसंगी तांत्रिक सल्ला देणे.

(क) प्रचार विभागामार्फत जनतेच्या मनावर वाहतुकीची समज बिंबवणे.

(ड) वेगमर्यादांच्या बंधनाची अंमलबजावणी करणे.

(इ) निषिद्ध वस्तुंच्या बेकायदेशीर वाहतुकीस प्रतिबंध करणे.

(२) राज्यातील महत्त्वाच्या मार्गावर व राष्ट्रीय महामार्गावर सुरक्षा गस्त पथके व वाहतूक मदत केंद्रे स्थापन करण्यात आली असून ती **अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)** यांच्या नियंत्रणाखाली असतात.

## ९. लोहमार्ग पोलीस यंत्रणा

राज्यातून जाणाऱ्या व येणाऱ्या रेल्वेबाबत प्रशासनाच्या दृष्टीने लोहमार्गाचे तीन घटक तयार करण्यात आले असून त्यांची मुख्यालये मुंबई, नागपूर व पुणे येथे आहेत. मुंबई घटकाचे प्रमुख अधिकारी हे **पोलीस आयुक्त** असून नागपूर व पुणे येथील लोहमार्ग घटकांचे प्रमुख हे **पोलीस अधीक्षक** दर्जाचे आहेत. वरील लोहमार्ग घटक हे **विशेष पोलीस महानिरीक्षक, लोहमार्ग, मुंबई** यांच्या नियंत्रणाखाली आहेत.

## १०. मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालय

मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयाची नव्याने स्थापना झाली असून त्याचे कार्यक्षेत्र पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट ते डंबरगांव रेल्वे स्थानकापर्यंत व मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी टर्मिनस ते कर्जत आणि कसारा तसेच हारबर रेल्वेवरील छत्रपती शिवाजी टर्मिनस ते पनवेलपर्यंत असे ठरविण्यात आले आहे. सदर आयुक्तालयात एकूण १७ लोहमार्ग पोलीस ठाणी आहेत. या यंत्रणेचे प्रभारी **रेल्वे पोलीस आयुक्त** असून या आयुक्तालयासाठी दोन पोलीस उप आयुक्त आणि आठ सहायक पोलीस आयुक्त व इतर पोलीस अधिकारी/कर्मचारीवर्ग मंजूर करण्यात आला आहे.

## ११. समाजसेवा शाखा

बृहन्मुंबई पोलीस दलाच्या आस्थापनेवरील " समाजसेवा शाखा " ही गुन्हे शाखेची उप शाखा आहे. या शाखेकडे मुख्यत्वेकरून नागरिकांशी सौहार्दपूर्ण संबंध निर्माण करण्याची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे महिलांवर होणारे अत्याचार, कौटुंबिक कलह, इत्यादी नाजूक प्रकरणेसुद्धा शाखेतर्फे हाताळली जातात. समाजसेवा शाखेतर्फे खालील प्रकरणे हाताळली जातात :—

(१) महिलांवर होणारे अत्याचार :—

(अ) कौटुंबिक हिंसा

(ब) पती-पत्नीमधील भांडणे

(क) हुंड्याकरिता अत्याचार

(ड) नोकरी किंवा कामाच्या ठिकाणी महिलांना होणारा लैंगिक त्रास

(इ) दूरध्वनी, पत्राद्वारे महिलांना होणारा त्रास.

(२) ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार

(३) अश्लिल साहित्याविरुद्ध कारवाई

(४) अश्लिल कॅसेट, चित्रफितीविरुद्ध कारवाई

(५) कॉपी राईटबाबतची प्रकरणे

(६) चित्रपटांच्या तिकिटांच्या काळ्या बाजाराची प्रकरणे

(७) क्रिकेट सामन्यांचा जुगार, अनधिकृत लॉटरी व अश्वशर्यतींचा अनधिकृत जुगार याबाबतची प्रकरणे.

(८) संगणकावरील इंटरनेटवर होणारे गुन्हे

(९) केबल नेटवर्क रेग्युलेशन ॲक्टची अंमलबजावणी

(१०)पोलिसांचा हस्तक्षेप आवश्यक असणारा इतर कोणताही सामाजिक विषय.

प्रत्येक जिल्हा पोलीस मुख्यालयात वरीलप्रमाणे समाजसेवा शाखा स्थापन करण्यात आली आहे.

## १२. नागरी हक्क संरक्षण

अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांवर अन्याय, अत्याचार होऊ नये म्हणून **विशेष पोलीस महानिरीक्षक (नागरी हक्क संरक्षण),मुंबई** यांच्या अधिपत्याखाली प्रत्येक परिक्षेत्राच्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक व प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी नागरी हक्क संरक्षण कक्ष कार्यरत आहे. नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ व अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ या अंतर्गत गुन्हा घडल्यास नागरिकांनी जवळच्या पोलीस स्टेशनला तक्रार करावी. सदर कायद्यान्वये दाखल गुन्हे यांचा तपास पोलीस उप अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत होतो. प्रतिबंधक कारवाई, दाखल गुन्ह्यांचा तपास इत्यादींबाबत नियंत्रण नागरी हक्क संरक्षण विभागातर्फे केले जाते.

## १३. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य

राज्य स्तरावर १९५७ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची स्वतंत्रपणे निर्मिती करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे मुख्यालय मुंबईत असून त्याचे प्रमुख **पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** हे आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुख्यालयाच्या अधिपत्याखाली पुणे, औरंगाबाद, ठाणे, नागपूर, नाशिक व अमरावती अशी परिक्षेत्रे असून त्या ठिकाणी **पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** यांचे नियंत्रण असते व अधिपत्याखालील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यालय असून **पोलीस उप अधीक्षक** दर्जाचे अधिकारी त्याचे प्रमुख असतात. बृहन्मुंबई जिल्ह्यासाठीचे कार्यालय मुख्यालयात असून त्यासाठी **अपर पोलीस आयुक्त** दर्जाचे अधिकारी आहेत.

शासकीय/निमशासकीय कार्यालयातील लोकसेवकांविरुद्धच नव्हे तर नगर/परिषदा, जिल्हा परिषदा, महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायती, स्वायत्त महामंडळे उदा.–महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कापूस पणन महामंडळ इत्यादींचाही समावेश आहे. याव्यतिरिक्त ज्या जिल्ह्यात/ ठिकाणी केंद्रिय अन्वेषण विभागाचे (सी.बी.आय.) कार्यालय नसेल अशा ठिकाणी केंद्र शासनाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध तसेच केंद्र शासनाचे सार्वजनिक उपक्रम उदा.- टेलिफोन निगम, आयुर्विमा महामंडळ इत्यादींविरुद्ध भ्रष्टाचारविषयक तक्रारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करता येतात. अशा तक्रारी विभागाकडील **कोणत्याही कार्यालयाकडे देता येतात.** या सर्व तक्रारींची दखल अत्यंत गुप्तपणे घेतली जाते. ज्यांनी तक्रार केली त्याबाबत गुप्तता पाळली जाते. तसेच तक्रारदारास कसलाही त्रास होणार नाही, याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात येते.

लोकसेवकाने लाचेची मागणी करणे, भ्रष्टाचारी मार्ग अवलंबून अपसंपदा तथा बेहिशोबी मालमत्ता जमा करणे व पदाचा गैरवापर करणे इत्यादी संबंधात लाचलुपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी नोंदविता येतात. शासकीय कार्यालयाशी संपर्क साधताना लोकसेवकाने किंवा त्याच्या समूहाने लाचेची मागणी केल्यास त्वरित या विभागाकडे संपर्क साधावा. या विभागाचे अधिकारी यशस्वीरीत्या गुप्तपणे सापळा रचून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार कार्यवाही करतात. लाचेच्या प्रकरणी एक दिवसाच्या सूचना कालावधीतदेखील कारवाई केली जाते. तसेच लाचेच्या सापळा प्रकरणात **तीन महिन्याच्या** कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तपासाचा अंतिम अहवाल तयार होणे अभिप्रेत आहे. एखाद्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर नियोजनबध्द रीत्या भ्रष्टाचार चालत असेल किंवा एखाद्या लोकसेवकाने बेहिशोबी तथा अवाजवी मालमत्ता गोळा केली असेल, त्यासंबंधीची सविस्तर माहिती या विभागाकडे कळविल्यास चौकशी करणे सुलभ होऊन परिणामकारक रीत्या कारवाई करणे शक्य होईल आणि अशा प्रकरणी एक वर्षाच्या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत तपास पूर्ण होणे अभिप्रेत आहे.

भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी व त्याचे निर्मूलन करण्यासाठी जनतेने निर्भिडपणे आपली गाऱ्हाणी या विभागापुढे मांडणे गरजेचे आहे. तक्रार गुप्त ठेवण्यास हा विभाग बांधील आहे.

## १४. ठेवीदाराच्या हित संबंधाचे संरक्षण

एखाद्या व्यक्तीस कोणा व्यक्तीने अथवा कंपनीने, त्या व्यक्तीने गुंतविलेल्या रकमेवर १६% पेक्षा अथवा (भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार विहीत केलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त व्याजाचे दर) किंवा बक्षीस देण्याचे किंवा सेवा पुरविण्याचे आमिष दाखवून त्या व्यक्तीकडे अथवा कंपनीकडे पैसे गुंतविण्यास प्रवृत्त करील आणि त्या व्यक्तीने पैसे गुंतविल्यावर दिलेल्या मुदतीनंतर व्याज आणि/अथवा मुद्दल रक्कम देण्यात टाळाटाळ/कसूर करील किंवा बक्षीस देण्यात अथवा सेवा पुरविण्यात कसूर करील तर, अशा व्यक्ती अथवा कंपनीविरुद्ध जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करता येते. जर गुंतविलेली रक्कम रुपये २० लाखांपेक्षा जास्त असेल किंवा अशा व्यक्तीने/कंपनीने अनेक व्यक्तींना वरील प्रकारे फसविले असेल, अशा वेळी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार करता येते.

महाराष्ट्र शासनाने " महाराष्ट्र ठेवीदाराच्या (वित्तीय संस्थांमधील) हित संबंधाचे संरक्षण अध्यादेश, १९९९ " अन्वये नवीन अध्यादेश जारी केला आहे. सदर अध्यादेशान्वये एखाद्या कंपनीने १६% पेक्षा जास्त व्याज देऊ केल्यास, सदर कंपनीच्या व्यवहाराची चौकशी करण्याचे अधिकार व सदर प्रकरणात घडलेल्या गुन्ह्याचा तपास करण्याचे अधिकार पोलिसांना आहेत.

सदर अध्यादेशान्वये तक्रारदारास जिल्हाधिकारी किंवा महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांच्याकडे देखील तक्रार करता येते.

तक्रारदाराने आपली तक्रार एका कागदावर संबंधित पोलीस ठाणेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक किंवा पोलीस उप-आयुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, गुन्हे शाखा, मुंबई यांना पोलीस आयुक्तांचे कार्यालय, ॲनेक्स-१, दुसरा मजला, डी.एन. रोड, मुंबई-१ या पत्त्यावर करावी तक्रारी सोबत अर्जदाराने संबंधित व्यक्तीने/कंपनीने तक्रारदारास दिलेल्या संबंधित योजने संदर्भातील कागदपत्राच्या नक्कला आणि तक्रारदाराने गुंतविलेल्या रक्कमेच्या पावत्यांच्या नक्कला तक्रार अर्जासोबत जोडाव्यात.